# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दि. १७/१२/२०१२

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दिनांक १७/१२/२०१२ रोजी सभा सुचना क्र. ०१ दि. १०/१२/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात सकाळी ११.०० वा. सभा आयोजित करण्यांत आली होती.

सदर सभेस पिठासिन अधिकारी म्हणून श्री. पी. वेलरासू मा. जिल्हाधिकारी, ठाणे हे उपस्थित होते. सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

**उपस्थित सदस्य**

१. श्री. राजु यशवंत भोईर
२. श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३. श्रीम. अनिता जयवंत पाटील
४. श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
५. श्री. मुन्ना सिंह
६. श्री. प्रमोद जयराम सामंत
७. श्री. राजेश शंकर वेतोस्कर
८. श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन
९. श्री. रोहिदास शंकर पाटील
१०. श्री. शरद केशव पाटील
११. श्रीम. मिरादेवी यादव
१२. डॉ. राजेंद्र जैन
१३. श्री. संदिप मोहन पाटील
१४. श्री. प्रविण मोरेश्वर पाटील
१५. श्री. प्रशांत ज्ञानदेव दळवी

**गैरहजर सदस्य**

१. सौ. सिमा महेंद्र जैन

**प्र. नगरसचिव :-**

आज स्थायी समिती सभापतीच्या निवडणुकीला उपस्थित असल्याबद्दल मी सर्व सदस्यांचे स्वागत करतो. तसेच आजच्या मिटिंगसाठी मा. जिल्हाधिकारी साहेब या ठिकाणी पिठासिन अधिकारी म्हणून कामकाज पाहणार आहेत.

**प्रमोद सामंत :-**

सचिव साहेब, तुम्ही आता दरवाजे बंद करु शकता ना.

**पिठासिन अधिकारी :-**

इलेक्शनच्या अगोदर इलेक्शनची प्रक्रिया कशी करायची ते मी सांगतो. त्यामध्ये इलेक्शनची प्रक्रिया हात वर करुन निवड करायची. तो पर्यंत सदस्य येवू शकतात.

**प्रमोद सामंत :-**

ठिक आहे.

**पिठासिन अधिकारी :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन्मा. सगळे सदस्य, महानगरपालिकेचे आयुक्त माझे सोबत बसलेले डेप्युटी कलेक्टर, नगरसचिव, पत्रकार बंधु आणि भगीनींनो आज इथे आपण मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या स्थायी समितीच्या सभापतींची निवड करणार आहोत. इथे मी पिठासिन अधिकारी म्हणून विभागीय आयुक्तांच्या प्रतिनिधी म्हणून कामकाज करणार आहे. मी आमचे डेप्युटी कलेक्टर श्री. रानडे यांना विनंती करतो की या इलेक्शनची प्रोसिजर आपल्याला समजून सांगणार आहे. त्यानंतर तुम्हाला काय विचारणा करायची असेल तर तुम्ही विचारणा करु शकता. त्यानंतर ती प्रोसिजर सुरु होईल. आता मी रानडे यांना विनंती करतो की, सगळयांना प्रोसिजर सांगावी.

**रानडे :-**

सर्व सन्मा. सदस्य, आज पिठासिन अधिका-यांनी जसे सांगितले ती प्रक्रिया आपल्याला थोडक्यात समजावून सांगतो. कारण २ समित्यांची निवडणुक आपण एकदम घेत आहोत. त्यामुळे आपल्याला पहिली प्रक्रिया कशी असते ती सांगतो. आपले अर्ज दाखल झालेले आहेत. आता फक्त छाननीची प्रक्रिया आहे. पिठासिन अधिकारी पहिल्यांदा छाननी सुरु करतील. छाननी करताना स्थायी समितीसाठी जे अर्ज आलेले आहेत

त्यांची छाननी होईल. त्यानंतर वैध जे नामनिर्देशन पत्र असतात, आपल्याला माहित आहे. एक सुचक एक अनुमोदन ते सर्व त्या समितीचे सदस्य असतील. एकापेक्षा जास्त लोकांना नॉमिनेशन केले असेल तर तो अर्ज बाद होतो. आपले जे अर्ज भरलेले आहेत त्याची छाननी आता होईल. छाननी झाली की १५ मिनीट विड्रॉल ची वेळ पूर्ण झाली. म्हणजे अर्ज मागे घ्यायची वेळ पूर्ण झाल्यानंतर निवडणूकीची प्रक्रिया सुरु होईल. त्यावेळेला जर विड्रॉल होऊनही अर्ज एक पेक्षा जास्त शिल्लक राहिले तर हात वर करुन निवडणूक घेण्याची पध्दत आहे. त्यामध्ये स्थायी समितीसाठी निवडणुक होईल. हात उंच करुन उमेदवार क्रमांक जे शिल्लक असेल त्या उमेदवारांच नाव पुकारले जाईल त्या मतदारांची स्वाक्षरी घेतली जाईल. त्याच व्हिडीओ रेकॉर्डिंग केल जाईल. त्यानंतर उमेदवार २ असेल त्यासाठी घेतल जाईल. आवश्यक असल्यास ३-४ साठी जेवढे उमेदवार असतील त्यासाठी नाव पुकारुन हात वर करुन मतदान घेतले जाईल. त्याची निवडणुक होईल. या पध्दतीने आजच कामकाज चालेल. प्रथम सर्वांना सचिव अजेंडा वाचून दाखवतील. नंतर पिठासिन अधिकारी छाननीला सुरुवात करतील.

**प्र. नगरसचिव :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. स्थायी समिती सभा सोमवार दि. १७/१२/२०१२ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात स्थायी समिती सभा सुचना क्र. ०१, दि. १०/१२/२०१२ रोजीच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. प्रकरण क्र.१, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१२-१३ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत. मा. स्थायी समितीसाठी आलेले जे नामनिर्देशन पत्र आहेत ते मी मा. पिठासिन अधिकारी यांच्याकडे सुपुर्त करतो.

**पिठासिन अधिकारी :-**

स्थायी समिती सभापती पदासाठी आपल्याकडे प्राप्त झालेले नामनिर्देशन पेपर आपण छाननी करणार आहोत. पहिला नामनिर्देशन पत्र माझ्या समोर आहे. श्री. संदिप मोहन पाटील, त्यांच्यासाठी सूचकाचे पूर्ण नाव आहे दळवी प्रशांत नामदेव, त्यांची सही आहे. अनुमोदन नाव आहे प्रविण मो. पाटील त्यांची पण सही आहे. म्हणून हे नामनिर्देशन पत्र वैध आहे. दुसर नामनिर्देशन पत्र आहे श्री. शरद केशव पाटील. त्यांच्या सुचकाच पूर्ण नाव आहे सौ. सीमा जैन, त्यांची सही आहे. अनुमोदकाच पूर्ण नाव आहे श्रीम. मिरादेवी यादव, त्यांची पण सही आहे. म्हणून हे नामनिर्देशन पत्र मी वैध ठरवतो. तिसरा नामनिर्देशन पत्र आहे ते पण श्री. शरद केशव पाटील त्यांच्या सुचकाचे पूर्ण नाव आहे डॉ. राजेंद्र जैन, अनुमोदकाच पूर्ण नाव आहे श्रीम. सिमा जैन. इथे दोन्ही सुचक आणि अनुमोदन आहेत. त्यांची सही पण आहे. हे नाम निर्देशनपत्र आपण वैध ठरवतो. आणि चौथा नामनिर्देशन पत्र आहे, श्री. भोईर राजू यशवंत, त्यांच्या सूचकाचे नाव आहे डिमेलो बर्नड अल्बर्ट त्यांची सही आहे. अनुमोदकाच नाव आहे अनिता जयवंत पाटील. दोघांची सही आहे. म्हणून हे नामनिर्देशनपत्र आपण वैध ठरवतो. आणि पाचवे नामनिर्देशपत्र आहे श्री. राजेश शंकर वेतोसकर यांचे त्यांच्या सुचकाचे पूर्ण नाव आहे श्री. प्रमोद जयराम सामंत, त्यांची सही आहे. आणि अनुमोदकाच पूर्ण नाव आहे बगाजी शर्मिला विल्सन, ह्यांची पण सही आहे. म्हणून हे नामनिर्देशन पत्र आपण वैध ठरवतो. म्हणजे आपल्यासमोर स्थायी समितीच्या सभापती पदासाठी चार उमेदवार आहेत. ५ नामनिर्देशन पत्र आहेत. १) श्री. संदिप मो. पाटील २) श्री. शरद के. पाटील ३) श्री. राजेश शं. वेतोसकर ४) श्री. भोईर राजू यशवंत टोटल चार उमेदवार आहे. स्थायी समिती सभापती पदासाठी चार उमेदवार आहेत. नामनिर्देशन पत्रांची छाननी झालेली आहे. आपण सगळे उमेदवार पात्र ठरवलेले आहे. आता कुणाला माघार घ्यायची असेल तर आतापासुन पंधरा मिनिटांच्या आत लिखित देवून माघार घ्यायची आहे. आता ११.२५ वाजले आहेत ११.४० पर्यंत आपण माघार घेवू शकता.

**बर्नड डिमेलो :-**

पिठासिन अधिकारी साहेब, आता आपण दरवाजा बंद करु शकतो का?

**पिठासिन अधिकारी :-**

आता माघार घ्यायची वेळ आहे.

**प्र. नगरसचिव :-**

स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीसाठी नामनिर्देशन मागे घेण्याची वेळ आता संपलेली आहे. कृपया सभागृहाचे दरवाजे बंद करुन घ्यावेत.

**पिठासिन अधिकारी :-**

स्थायी समितीच्या सभापती पदासाठी आता ४ उमेदवार पैकी २ उमेदवार माघार घेतलेले आहेत. तर शिल्लक राहिलेले दोन उमेदवारांचे नाव मराठी भाषेच्या शब्दाप्रमाणे केलेल आहे. १) भोईर राजु यशवंत २) शरद केशव पाटील. सुरुवातीला श्री. राजू भोईर यशवंत यांच्यासाठी मतदान देणाऱ्या सदस्यांनी हातवर करायचे. २) श्री. शरद केशव पाटील त्यांच्यासाठी मतदान करणाऱ्या सदस्यांनी हातवर करायचे. धन्यवाद.

**प्र. नगरसचिव :-**

प्रथम श्री. राजु भोईर यांच्या बाजूने ज्यांनी मतदान केले आहे त्यांची नावे वाचून दाखवत आहे.

**श्री. भोईर राजू यशवंत ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
२) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३) श्रीम. अनिता पाटील
४) श्री. मुन्ना सिंह
५) श्री. राजू भोईर
६) श्री. प्रमोद जयराम सामंत
७) श्री. राजेश शंकर वेतोस्कर
८) श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन

**श्री. राजू भोईर ह्यांच्या विरोधात मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. रोहिदास शंकर पाटील
२) श्री. शरद केशव पाटील
३) श्रीम. मिरादेवी यादव
४) डॉ. राजेंद्र जैन
५) श्री. संदिप पाटील
६) श्री. प्रविण पाटील
७) श्री. प्रशांत दळवी

आत मी श्री. शरद केशव पाटील ह्यांच्या बाजून ज्यांनी मतदान केले आहे त्यांची नावे वाचून दाखवत आहे.

**श्री. शरद केशव पाटील ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. रोहिदास शंकर पाटील
२) श्री. शरद केशव पाटील
३) श्रीम. मिरादेवी यादव
४) डॉ. राजेंद्र जैन
५) श्री. संदिप पाटील
६) श्री. प्रविण पाटील
७) श्री. प्रशांत दळवी

**श्री. शरद केशव पाटील ह्यांच्या विरोधात मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
२) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३) श्रीम. अनिता पाटील
४) श्री. मुन्ना सिंह
५) श्री. राजू भोईर
६) श्री. प्रमोद जयराम सामंत
७) श्री. राजेश शंकर वेतोस्कर
८) श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन

**पिठासीन अधिकारी :-**

आता स्थायी समितीच्या सभापती पदासाठी आपण निवडणुक घेतलेली आहे. त्याचा रिझल्र्ट आता मी जाहिर करतो. श्री. राजू भोईर यांना आठ मतदान भेटलेले आहे आणि श्री. शरद केशव पाटील यांना सात मतदान भेटलेले आहे. म्हणून मी पिठासिन अधिकारी म्हणून श्री. राजु यशवंत भोईर यांची निवड, स्थायी समितीच्या सभापती पदासाठी झाली आहे म्हणून घोषित करतो.

**प्रकरण क्र. ०१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम २१ पोटकलम (१) अन्वये सन २०१२-१३ या सालाकरिता मा. स्थायी समितीवर असणाऱ्या सदस्यांपैकी एका सदस्याची सभापती स्थायी समिती म्हणून नेमणुक करणेबाबत.

**ठराव क्र. ०१ :-**

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनमय १९४९ मधील प्रकरण २ कलम २१ पोटकलम (१) अन्वये स्थायी समिती करिता ''सभापती'' पदावर नेमणुक करणेसाठी निश्चित केलेल्या तारखेस व वेळेत नामनिर्देशन पत्र मागविली असता (१) श्री. संदिप मोहन पाटील, (२) श्री. शरद केशव पाटील ३) श्री. भोईर राजू यशवंत व ४) श्री. राजेश शंकर वेतोसकर ह्यांनी आपली नामनिर्देशन पत्र दाखल केली. नामनिर्देशन पत्रांची छाननी केली असता सर्व नामनिर्देशन पत्र वैध ठरलेली आहेत. प्रत्यक्ष निवडणुक प्रक्रिया सुरु होणेपुर्वी नियमानुसार

उमेदवारांस आपले नामनिर्देशन पत्र मागे घेणे करिता १५ मिनिटांचा अवधी दिला असता (१) श्री. राजेश शंकर वेतोसकर व (२) श्री. संदिप मोहन पाटील ह्यांनी आपली उमेदवारी मागे घेतल्याने एकुण दोन उमेदवार शिल्लक राहिले. ''सभापती'' पद हे एकच असल्याने व उमेदवार दोन असल्याने हात वर करुन मतदान घेतले असता (१) श्री. भोईर राजू यशवंत ह्यांना ०८ इतकी मते मिळाली. व (२) श्री. शरद केशव पाटील ह्यांना ०७ इतकी मते मिळाली.

**श्री. भोईर राजू यशवंत ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

१) श्री. बर्नड आल्बर्ट डिमेलो
२) श्रीम. हेलन जॉर्जी गोविंद
३) श्रीम. अनिता पाटील
४) श्री. मुन्ना सिंह
५) श्री. राजू भोईर
६) श्री. प्रमोद जयराम सामंत
७) श्री. राजेश शंकर वेतोस्कर
८) श्रीम. बगाजी शर्मिला विल्सन

**श्री. शरद केशव पाटील ह्यांच्या बाजूने मतदान केलेल्या सदस्यांची नावे :-**

७) श्री. रोहिदास शंकर पाटील
८) श्री. शरद केशव पाटील
९) श्रीम. मिरादेवी यादव
१०) डॉ. राजेंद्र जैन
११) श्री. संदिप पाटील
१२) श्री. प्रविण पाटील
१३) श्री. प्रशांत दळवी

| | | |
|---|---|---|
| **तटस्थ सदस्यांची नांवे –** | निरंक | |
| **मतदानावेळी एकूण हजर सदस्य** | :- | **१५** |
| **श्री. भोईर राजू यशवंत ह्यांच्या बाजूने** | :- | **०८** |
| **श्री. शरद केशव पाटील ह्यांच्या बाजूने** | :- | **०७** |
| **तटस्थ** | :- | **००** |
| **अनुपस्थित सदस्य** | :- | **०१** |
| **एकूण** | :- | **१६** |

श्री. राजू यशवंत भोईर ह्यांना जास्त मते मिळाल्याने श्री. राजू यशवंत भोईर यांची निवडून आल्याच्या दिनांकापासुन एक वर्षाकरीता सभापती, स्थायी समिती समिती या पदाकरिता मतदानाद्वारे निवड झाल्याचे मी घोषित करीत आहे.

**सही/-**
**पिठासिन अधिकारी**
**स्थायी समिती सभा**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव :-**

राजु भोईर यांनी कृपया डायसवर यायचे आहे.

(राजु भोईर यांना पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले.)

**पिठासिन अधिकारी :-**

मी आपल्या सगळयांना या इलेक्शन प्रिकेबल पूर्ण सहभाग दिला त्याबद्दल मी धन्यवाद देतो. आणि आजची सभा संपली असे मी घोषित करतो.

**(सभा संपल्याची वेळ सकाळी ११.५० वा.)**

**सही/-**
**पिठासीन अधिकारी**
**स्थायी समिती**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्र. नगरसचिव**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**